# ऋ ण नि र्दे श

प्रस्तुत शोधप्रबंध सादर करताना मला आनंद होतो आहे. या आनंदात अनेकांचा सहभाग आहे.

या शोधप्रबंधासाठी गुरुवर्य डॉ. रामचंद्र भालचंद्र देवस्थळी, प्राध्यापक आणि विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे मार्गदर्शन लाभले हे मी माझे भाग्यच समजतो. त्यांचे उत्तेजन, प्रेरणा आणि सहकार्य यांमुळेच हा शोधप्रबंध सिध्द होऊ शकला. मी त्यांचा सदैव कृतज्ञ आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन-सामग्री प्राप्त करण्यासाठी निवडलेल्या माध्यमिक शाळा, वर्गशिक्षक आणि विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. शाळांतील ग्रंथालयीन दप्तर आणि कामकाज पाहण्यासाठी संबंधित ग्रंथपाल -शिक्षकांचे सर्वतोपरी सहकार्य लाभले. त्यांचा मी आभारी आहे. मुलाखतीसाठी आपला बहुमोल वेळ देणा-या मुख्याध्यापकांचा, शिक्षकांचा आणि पालकांचा मी आभारी आहे. या सर्वांच्या सहकार्याचा हातभार या संशोधनास लाभला आहे.

रा. वि. परुळेकर ग्रंथालय व आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालयाचे ग्रंथालय, श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी येथील ग्रंथपाल आणि त्यांचे सहकारी यांची कृतज्ञतापूर्वक नोंद घेणेअनिवार्य आहे.

आत्मीय डॉ. विजय निंबाळकर, प्रा.आर.टी. चौत्रे, प्रा.बी.ए.शिंदे, प्रा.एस.एस. अडावदकर, प्राचार्य डॉ. आनंद वास्कर, प्रा. राजन गवस, डॉ.जयंत कळके, डॉ. डी.आर. शिरगावे, डॉ. लिला पाटील, प्रा.व्ही.एल.ठोंबरे यांचे उत्तेजन आणि सहकार्य लाभले. त्यांचा मी कृतज्ञ आहे.

शोधप्रबंधाचे टंकलेखन विष्णू खाडे यांनी अल्पकाळात करुन दिले त्यांचा मी आभारी आहे.

स्थळ -

दिनांक -

रामचंद्र धोंडिबा बेलेकर,
संशोधक

.....